# दैनिक महावृत्त

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990



Bharat Chandak
SATYA ELECTRICALS
POLYCAB, legrand, HAVELLS, Finolex, KOLORS, USHA, PHILIPS, SIEMENS
Tapadia Market, Chain Sukh Road, Latur-413512
Ph :(O) 243678, 244458, 250776, (R) 242018
Email:satyaelectricals@rediffmail.com



लातूर वर्ष ४ थे अंक १७ वा शुक्रवार दि.१४ जून २०२४ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.


# विद्यार्थ्यांची फेरपरीक्षा घेण्याचे सर्वोच्च न्यायालयाचे आदेश

नवी दिल्ली : नीट परीक्षेच्या निकालात ग्रेस गुण मिळालेल्या १५६३ विद्यार्थ्यांची गुणपत्रिका रद्द करून या विद्यार्थ्यांची २३ जून रोजी फेरपरीक्षा घेण्याचे आदेश सर्वोच्च न्यायालयाने गुरूवारी दिले. मात्र, वैद्यकीय अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी ६ जुलैपासून सुरू होणाऱ्या विद्यार्थ्यांच्या समुपदेशनावर (काऊन्सिलिंग) कुठलीही स्थगिती देण्यास सर्वोच्च न्यायालयाने नकार दिला. ग्रेस गुण रद्द झालेली गुणपत्रिका स्वीकारण्याचा अथवा फेरपरीक्षा देण्याचा पर्यायही सर्वोच्च न्यायालयाने या विद्यार्थ्यांना उपलब्ध करून दिला आहे. नीट परीक्षेतील कथित पेपरफुटी आणि निकालातील गोंधळप्रकरणी सर्वोच्च न्यायालयात तीन वेगवेगळ्या याचिका दाखल करण्यात आल्या आहेत. या संपूर्ण प्रकरणाची एसआयटीमार्फत चौकशी करून वैद्यकीय अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी विद्यार्थ्यांचे केले जाणारे समुपदेशन थांबविण्याची मागणी या याचिकांमधून करण्यात आली आहे. त्यावर न्यायमूर्ती विक्रमनाथ आणि न्यायमूर्ती संदीप मेहता यांच्या खंडपीठासमोर सुनावणी सुरू आहे. या सुनावणीदरम्यान युक्तिवाद करताना ग्रेस गुण मिळालेल्या १५६३ विद्यार्थ्यांची २३ जून रोजी फेरपरीक्षा घेतली जाणार आहे आणि या परीक्षेचा निकाल ३० जूनपूर्वी जाहीर केला जाणार असल्याची माहिती राष्ट्रीय चाचणी संस्थेचे (एनटीए) वकील नरेश कौशिक यांनी न्यायालयाला दिली. विद्यार्थ्यांच्या प्रवेशासाठी ६ जुलैपासून सुरू होणाऱ्या समुपदेशनावर फेरपरीक्षेचा काहीही परिणाम होणार नसल्याचे त्यांनी सांगितले. नीट परीक्षेच्या निकालाचा आढावा घेण्यासाठी एक समिती गठीत करण्यात आली आहे. ही समिती विद्यार्थ्यांना देण्यात आलेल्या ग्रेस गुणांबाबत चौकशी करणार आहे. या समितीने ग्रेस गुण मिळालेल्या विद्यार्थ्यांची गुणपत्रिका रद्द करून त्यांना फेरपरीक्षा देण्याचा पर्याय दिल्याची माहिती एनटीएच्या वकिलांनी दिली.एनटीएची संपूर्ण बाजू ऐकून घेतल्यानंतर ग्रेस गुण मिळालेल्या १५६३ विद्यार्थ्यांची फेरपरीक्षा घेण्याचे आदेश खंडपीठाने दिले. फेरपरीक्षा घेतल्यास नीट परीक्षेच्या निकालातील गोंधळ दूर होऊन सर्वकाही सुरळीत होईल, असेही खंडपीठाने स्पष्ट केले. मात्र, विद्यार्थ्यांच्या समुपदेशनावर स्थगिती देण्यास खंडपीठाने नकार दिला.कथित पेपरफुटीप्रकरणी दाखल याचिकेवर सर्वोच्च न्यायालयाने ८ जुलै रोजी सुनावणी निश्चित केली आहे. विद्यार्थ्यांना ग्रेस गुण देण्याचा प्रकार चुकीचा असल्याची बाब एनटीए संस्थेने न्यायालयापुढे मान्य केल्याचे याचिकाकर्ते व नीट परीक्षा कोचिंग संचालक अलख पांडे यांनी निकालानंतर सांगितले. नीट परीक्षा गोंधळ, नेमके प्रकरण काय? नीट परीक्षा २०२४ चा निकाल ४ जून रोजी जाहीर झाला. मात्र, या निकालात तब्बल १५६३ विद्यार्थ्यांना ग्रेस गुण देण्यात आल्याने वादळ उठले आहे. असंख्य विद्यार्थ्यांना पैकीच्या पैकी गुण मिळाल्याने विद्यार्थी व पालकांमध्ये असंतोष निर्माण झाला आहे. नीट निकालातील गोंधळावरून महाराष्ट्र, दिल्ली, हरियाणासह देशभरात आंदोलन सुरू आहे. राष्ट्रीय चाचणी संस्थेचे (एनटीए) निकालातील गोंधळाची चौकशी करण्यासाठी समिती नेमली आहे. विद्यार्थी, पालकांनी निकालाविरोधात उच्च न्यायालय व सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली आहे. नीट प्रकरणी आता उच्च न्यायालयात सुनावणी नाही नीट परीक्षेतील गोंधळाविरोधात वेगवेगळ्या राज्यांमध्ये सुमारे



२० हजार विद्यार्थ्यांनी याचिका दाखल केल्या होत्या. उच्च न्यायालयातही याप्रकरणी याचिका दाखल करण्यात आल्या आहेत. मात्र, आता सर्वोच्च न्यायालयाने निर्णय दिल्यामुळे यापुढे उच्च न्यायालयात सुनावणी होणार नाही. नीट परीक्षेत पेपरफुटी नाही : धर्मेंद्र प्रधान

नीट परीक्षेत पेपरफुटी झाल्याचा कुठलाही पुरावा नसल्याचे सांगून याबाबत होत असलेले आरोप केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी फेटाळून लावले आहेत. ते म्हणाले की, एनटीए ही देशातील विश्वासार्ह संस्था असून या संस्थेवर लावण्यात आलेले गैरप्रकाराचे आरोप निराधार आहेत. याप्रकरणी सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयाचे त्यांनी स्वागत केले. नीट परीक्षेत गैरप्रकार झाल्याचा काँग्रेसचा आरोप नीट परीक्षेत ग्रेस गुणांच्या घोळासह पेपरफुटी झाल्याचा आरोप काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जून खर्गे यांनी केला आहे. सरकारमुळे नीट परीक्षेला बसणाऱ्या २४ लाख विद्यार्थ्यांचे भवितव्य धोक्यात आल्याची टीका त्यांनी केली आहे.

## लातूरचे नवनिर्वाचित खासदार डॉ. शिवाजी काळगे यांनी सहकाऱ्यांसह मराठा आरक्षण संघर्ष योद्धे मनोज जरांगे पाटील यांची घेतली भेट.



लातूर / प्रतिनिधी :- लातूरचे नवनिर्वाचित खासदार डॉ. शिवाजी काळगे यांनी काँग्रेस व महाविकास आघाडीच्या सहकार्यांसह गुरुवारी सायंकाळी छत्रपती संभाजी नगर येथील गॅलेक्सी हॉस्पिटल येथे जाऊन मराठा आरक्षण संघर्ष योद्धे मा.श्री.मनोज दादा जरांगे पाटील यांची भेट घेतली. त्यांच्या तब्येतीची आस्थेने विचारपूस केली. त्याचबरोबर मराठा समाजाच्या मागण्या साठी केंद्र व राज्य शासनाकडे पाठपुरावा करण्यात येईल अशी ग्वाही दिली. यावेळी त्यांच्या समवेत रेणा कारखान्याचे चेअरमन सर्जेराव मोरे , शेकापचे नेते भाई उदय गवारे, ट्वेंटीवन शुगरचे व्हाईस चेअरमन विजय देशमुख, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे सचिव अभय साळुंके, विलास सहकारी साखर कारखान्याचे व्हाईस चेअरमन रवींद्र काळे, तसेच हंसराज जाधव, रमेश सूर्यवंशी, धनंजय शेळके सर यांच्यासह अनेक पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.

## कर्नाटकचे माजी मुख्यमंत्री येडियुरप्पा यांच्याविरोधात अजामीनपात्र वॉरंट जारी

बंगळूरू : कर्नाटकातून एक मोठी बातमी समोर आली आहे. कर्नाटकचे माजी मुख्यमंत्री बी एस येडियुरप्पा यांच्याविरुद्ध अजामीनपात्र वॉरंट जारी करण्यात आले आहे. पॉक्सो प्रकरणात बंगळुरू न्यायालयाने हा निर्णय दिला आहे. काल सीआयडीने येडियुरप्पा यांना लैंगिक छळ प्रकरणी चौकशीसाठी समन्स बजावले होते. मात्र ते सीआयडीसमोर हजर झाले नाहीत. अटकेच्या भीतीने येडियुरप्पा यांनी कर्नाटक उच्च न्यायालयात अटकपूर्व जामीन याचिका दाखल केली होती.१७ वर्षीय मुलीचा विनयभंग केल्याच्या आरोपावरून पोक्सो कायद्यानुसार खटला चालवला जात आहे. लैंगिक छळ प्रकरणी सीआयडीने बुधवारी माजी मुख्यमंत्री येडीयुरप्पा यांना चौकशीसाठी बोलावले. येडियुरप्पा यांच्या



वकिलांनी सीआयडीसमोर हजर राहण्यासाठी एका आठवड्याची मुदत मागितली. पण, आज गुरुवारी बंगळुरू न्यायालयाने बीएस येडियुरप्पा यांच्याविरोधात अजामीनपात्र वॉरंट जारी केले.

मुलीच्या आईने १४ मार्च रोजी सदाशिवनगर पोलिस ठाण्यामध्ये येडियुरप्पा यांच्याविरोधात तक्रार दाखल केली होती. तक्रारीच्या आधारे, पोलिसांनी त्यांच्याविरुद्ध पॉक्सो आणि कलम ३५४ ए अंतर्गत गुन्हा दाखल केला. ही घटना २ फेब्रुवारी रोजी घडली, तेव्हा ते एका प्रकरणात मदतीसाठी येडीयुरप्पा यांच्या घरी गेले होते असा आरोप मुलीच्या आईने केला आहे. माजी मुख्यमंत्री येडियुरप्पा यांनी उच्च न्यायालयात दाद मागितली आहे. यात त्यांनी म्हटले की, कारण हा खटला रद्द करण्यात यावा, कारण त्यांच्याविरुद्ध कोणताही गुन्हा सिद्ध करण्यासारखे काहीही नाही.

## दोन तलाठ्यांच्या वादात डी आर शिंदे यांनाच मिळाला आर्वी सज्जाचा अतिरिक्त पदभार





लातूर - लातूर तालुक्यातील लातूर शहरालगत असलेल्या आर्वी तलाठी सज्जाचा अतिरिक्त पदभार मिळावा यासाठी कतला कुटे, धुमाळ या दोन तलाठ्यांमध्ये स्पर्धा लागली होती. मात्र या दोघांच्या वादात डी आर शिंदे या तिसर्याच तलाठ्याला आर्वी सज्जाचा पदभार मिळाला आहे. त्यामुळे लातूर तहसील कार्यालयात व आर्वी गावात याबद्दल चर्चेला १३ जून रोजी उधाण आले होते. याचे झाले असे की आर्वी तलाठी सज्जाचा अतिरिक्त पदभार आपणासच मिळावा, यासाठी तलाठी विलास कतलाकुटे आणि गोविंद धुमाळ यांच्यात स्पर्धा लागली होती. तसेच गोविंद धुमाळ यांच्या अर्जावर शिफारस देखील झाली होती. पण असे काय झाले की विलास कतलाकुटे यांना आर्वी सज्जाची डी एस सी अतिरिक्त पदभार मिळाला होता. तलाठी धुमाळ यांनी माझ्यावर अन्याय झाला आहे म्हणून तलाठी संघटनेकडे न्याय मागणी अर्ज केला. मात्र ऐनवेळी कन्हेरी सज्जाचे तलाठी यांना आर्वी सज्जाचा पदभार वरिष्ठांनी दिल्याने दोघांच्या वादात तिसर्याचा लाभ झाला आहे. विशेष म्हणजे याआधी काही दिवस गोविंद धुमाळ यांना काही दिवस आर्वी सज्जाचा पदभार देण्यात आला होता. आणि मधल्या काळात पुलाखालून बरेच पाणी वाहून गेल्याने आर्वी सज्जाचा पदभार तिसरेच कन्हेरी सज्जाचे तलाठी डी. आर. शिंदे यांच्याकडे सोपवण्यात आला आहे. या सर्व उलाढालीत नेमका काय प्रकार घडला, हे असे का घडले. याबद्दल उलट सूलट चर्चा लातूर उपविभागीय, तहसील कार्यालयात होताना दिसते आहे.

## पूर्ण क्षमतेने प्रत्युत्तर द्या

नवी दिल्ली : काश्मीर खो-यामध्ये गेल्या काही दिवसांपासून दहशतवाद्यांनी डोके वर काढण्यास सुरुवात केली आहे. काही दिवसांपूर्वी शिवखोडीला जाणा-या बसवर दहशतवाद्यांनी गोळीबार केला होता, ज्यात १० जणांचा मृत्यू झाला होता. हा भाग इतरांच्या तुलनेत सुरक्षित मानला जात होता आणि तिथे दहशतवादी हल्ल्याच्या घटना देखील घडत नव्हत्या. मात्र या घटनेनंतर चित्र बदलले आणि सुरक्षा दलाने या भागात शोध मोहिम अधिक तीव्र केली. ही घटना ताजी असतानाच दहशतवादी हल्ल्याच्या आणखी चार घटनांनी जम्मू काश्मीर हादरले आहे. या घटनानंतर आता केंद्र सरकारने तिथल्या परिस्थितीचा आढावा घेण्यास सुरुवात केली. पंतप्रधानांनी जम्मू-काश्मीरचे नायब राज्यपाल मनोज सिन्हा यांच्याशीही बोलून तिथल्या परिस्थितीचा आढावा घेतला.गेल्या काही दिवसांत जम्मू-काश्मीरमध्ये अनेक दहशतवादी हल्ले झाले आहेत.

## खासदार शिवाजी बंडाप्पा काळगे यांच्या नेतृत्वाखाली लातुर काँग्रेस कमिटीच्या वतीने जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर - घुगे यांना निवेदन

गोगलगाय प्रादुर्भाव नियंत्रणासाठी उपाययोजना करावी शेतकऱ्यांना आवश्यक बियाणे आणि खतांची उपलब्धता करावी बोगस बियाणे आणि खते रोखावीत गतवर्षीच्या खरीप हंगामातील पिकवीमा शेतकऱ्यांना तातडीने देण्यात यावा



लातूर / प्रतिनिधी : - लातूर लोकसभा मतदार संघासह लातूर जिल्हयातील शेतकऱ्यांसाठी खरीप हंगाम महत्वाचा आहे. यावर्षी पाऊस वेळेवर पडल्याने सर्व शेतकरी पेरणीच्या कामात व्यस्त आहेत. खरीपासाठी शेतकऱ्यांना चांगले खत व बियाणे मिळावीत, बोगस बियाणे आणि खते रोखून शेतकऱ्यांना आवश्यक दर्जेदार बियाणे आणि खतांची उपलब्धता करावी, खरीपातील सोयाबीन आणि इतर पिकावरील शंखी गोगलगाय, पिवळा मोझॅक आणि तुरीवरील मर रोग यांच्या नियंत्रणासाठी प्रतिबंधात्मक उपाय करावेत, तसेच गतवर्षीच्या खरीप हंगामातील पिकवीमा शेतकऱ्यांना देण्यात यावा या मागणीचे निवेदन लातूर लोकसभेचे खासदार शिवाजी बंडाप्पा काळगे यांच्या नेतृत्वाखाली लातुर काँग्रेस कमिटीच्या वतीने जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर - घुगे यांना देण्यात आले. खरीप हंगाम सुरु होत असतांना शेतकऱ्याकडून खते - बियाणेचा दर्जा,उपलब्धता या बाबत तक्रारी येऊ लागल्या. पेरणी सुरू असतांनाच खरीपातील सोयाबीन आणि इतर पिकावरील शंखी गोगलगाय, पिवळा मोझॅक आणि तुरीवरील मर रोग नियंत्रणासाठी उपायाची आवश्यकता दिसू लागली. तसेच गतवर्षीच्या खरीप हंगामातील पिकवीमा शेतकऱ्यांना अदयाप मिळाला नाही. याअनुषंगाने सहकार महर्षी माजी मंत्री दिलीपराव देशमुख, राज्याचे माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख, लातूर ग्रामीणचे आमदार धीरज विलासराव देशमुख यांनी सदरील बाबत जिल्हाधीकारी यांना निवेदन दयावे, अशी सुचना काँग्रेस कमिटीला देण्यात आल्या. या अनुषंगाने लातूर लोकसभेचे खासदार शिवाजी बंडाप्पा काळगे यांच्या नेतृत्वाखाली लातुर काँग्रेस कमिटीच्या वतीने जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर - घुगे यांना गुरूवार दि. १३ जून रोजी दुपारी निवेदन देण्यात आले. यावेळी त्यांच्या सोबत लातुर जिल्हा काँग्रेस कमिटी अध्यक्ष श्रीशैल उटगे, लातूर शहर जिल्हा काँग्रेस कमिटी अध्यक्ष ड. किरण जाधव, प्रदेश सचिव अभय सांळूके, विलास कारखान्याचे व्हा. चेअरमन रविंद्र काळे, ड. बाबासाहेब गायकवाड, डॉ. अरविंद भाताब्रे, सुपर्ण जगताप, रमेश सुर्यवंशी, प्रविण सुर्यवंशी, इम्रान सय्यद, मारूती पांडे, प्रा. प्रविण कांबळे, प्रा. राजकूमार जाधव, ड. देविदास बोरुळे पाटील, ड. प्रविण पाटील, शिवाजी कांबळे, अभिजीत इगे, शरद देशमुख, मुकेश राजेमाने, राम स्वामी, सोनू डगवाले, प्रा.एम.पी. देशमुख, नागसेन कामेगावकर, सुलेखा कारेपूरकर, दत्ता सोमवंशी, अब्दुला शेख, असिफ बागवान, विजय टाकेकर आदी उपस्थित होते. या निवेदनाव्दारे खरीप हंगाम सुरू झाला आहे. पाऊस वेळेवर पडल्याने सर्व शेतकरी पेरणीच्या तयारीत आहेत. लातूर जिल्हयातील पेरणीच्या प्रस्तावित क्षेत्रानुसार बियाणे आणि खते उपलब्ध करून देण्यासाठी प्रशासनाने सूक्ष्म नियोजन करावे. या काळात शेतकऱ्यांची फसवणूक होऊ नये यासाठी जिल्ह्यात बोगस बियाणे आणि खते विक्री होऊ नये यासाठी पथके स्थापन करून कारवाई करून फसवणूक होणार नाही याची काळजी घ्यावी. पेरणी हंगाम महत्वाचा असल्याने विविध पिकांच्या पेरणीची योग्य वेळ आणि पद्धत, रोग आणि प्रतिबंधात्मक उपाययोजना याबद्दल माहिती देण्यासाठी कृषी विभागाने विशेष मोहिम राबवावी जेणे करून दुबार पेरणीचे संकट येणार नाही याची काळजी घ्यावी. लातूर जिल्हयात गेल्या दोन तीन वर्षापासून अनेक गावात खरीप हंगामामध्ये सोयाबीन पिकावर शंखी गोगलगाय व इतर पिकावर पिवळा मोझॅक आणि तूरीवरील मररोग प्रादूर्भाव मोठया प्रमाणात होऊन शेतकऱ्यांचे नुकसान होत आहे.खरीपाची सुरू होत आहे, यासाठी सुरूवातीलाच संबंधित विभागाकडून संभाव्य उपायोजना करणे आवश्यक आहे. गतवर्षी शेतामध्ये गोगलगायींचा प्रादुर्भाव हा जास्त दिसून आला व तो दिवसेंदिवस वाढत गेला. काही भागात पुर्ण शिवार गोगलगायींनी फस्त केले आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना आंतरमशागत सोडून गोगलगायी वेचाव्या लागल्या. यातून अनेक शेतकऱ्यांसमोर दुबार पेरणीचे संकट उभे राहिले होते. ही स्थिती लक्षात घेऊन अशी वेळ यावर्षी येऊ नये यासाठी तातडीने उपाययोजना कराव्यात. गतवर्षीच्या खरीप हंगामात सुरुवातीस अल्प पाऊस झाल्यामुळे शेतकऱ्यांनी पेरणी केल्यानंतर पाऊसाने दिर्घकाळ उघाड दिली. यामुळे अनेक शेतकऱ्यांना दुबार पेरणी करावी लागली होती. यात खरीप पिकांचे नुकसान झाले. शासनाने नुकसान भरपाई आणि कंपनीने विमा देण्याचे जाहीर केले, मात्र शेतऱ्यांना नुकसान भरपाई मिळाली नाही. केवळ २५ टक्के विमा रक्कम मिळाली. तरी शेतऱ्यांना नुकसान भरपाई व उर्वरीत विमा रक्कम मिळावी आदी मागण्याचे निवेदन देण्यात आले आहे.


ऐका चक्कर-कर्णबधीर निदान व उपचार केंद्र
ऐकू येत नाही ? ऐकावं तुम्ही म्हणून इथे आहोत आम्ही !
कर्णबधिर निदान व उपचार शिबीर
श्रवणयंत्रावर आकर्षक सुट (Discount)
Analog Hearing Aids / Digital Hearing Aids
रु 12000 ते 13000 किमतीचे श्रवणयंत्र फक्त 8200/- मध्ये उपलब्ध
रु 26000 किमतीचे श्रवणयंत्र फक्त 21000/- मध्ये उपलब्ध
आकर्षक सुट ( Discount ) डिजिटल मशिनवर
श्रवणशक्ती कमी झाल्याची लक्षणे :-
तुम्हाला टेलिफोनवर ऐकताना समस्या जाणवते का ?
गोंधळ, गडबड चालू असताना ऐकायला त्रास होतो का ?
स्त्रियांचे आणि मुलांचे बोलणे समजायला त्रास होतो का ?
DR.SRISAILAM TALARI
M. A. S. L. P (Pune)
(Audiologist & Hearing Specialist)
RCI - A46081
दिनांक 13 ते 15 जुन 2024
उटगे चाईल्ड डेव्लपमेंट सेंटर, तहसील ऑफिस समोर, हॉटेल चितीकीरण पहिला मजला, मेन रोड, लातूर- ४१३५१२
02382-242011, 8282809996, 7057040302
अधिक माहिती साठी संपर्क
विवेक हणवते मो.७०५७०४०३०२

## संपादकीय....

# विध्वंसविरामाच्या वाटेवर

हजारो इस्रायलींचा काटा काढून नेतान्याहूंना धडा शिकवला असे हमासच्या नेत्यांना वाटत असेल, तर मग कित्येक पट अधिक हानी गाझावासीयांची झाली, त्याचे काय? गाझामधील भीषण संघर्ष थांबवण्यासाठी किंवा थांबवण्याच्या दिशेने शाश्वत पावले टाकण्यासाठी आणखी एका ठरावावर सोमवारी संयुक्त राष्ट्रांच्या सुरक्षा परिषदेत मतदान घेण्यात आले. त्यात १५ पैकी १४ सदस्यांनी ठरावाच्या बाजूने मतदान केले. केवळ रशियानेच तटस्थ भूमिका घेतली, कारण या प्रस्तावाची कर्ती–करविती अमेरिका होती. आजवर इस्रायल–हमास दरम्यान असंख्य युद्धविराम प्रस्तावांवर असंख्य वेळा मतदान झालेले आहे. तरी आठ महिने संघर्ष सुरूच असून, दररोज जीवितहानीच्या करुण कहाण्या आणि आकडेवारी प्रसृत होत आहे. युद्धविरामाविषयी इस्रायल आणि हमास सोडून बाकीचेच गंभीर असल्याचे एकंदरीत चित्र आहे. असो. तरी या वेळच्या प्रस्तावाचे वेगळेपण म्हणजे, अमेरिकेने आणि अध्यक्ष जो बायडेन यांनी पुढाकार घेऊन तो बनवला होता. त्यांनी तो मूळ इस्रायली प्रस्तावात सुधारणा करून सादर केला का, याविषयी संदिग्धता आहे. प्रस्ताव मूळ इस्रायलचा असेल, तर अशा प्रकारे इस्रायलकडून तो मांडला जाण्याची ही पहिलीच वेळ. हा युद्धविराम प्रस्ताव तीन टप्प्यांत अमलात आणायचा आहे. पहिल्या टप्प्याअंतर्गत सहा आठवड्यांमध्ये इस्रायलने गाझातील मुख्य शहरांतून माघार घ्यायची आणि त्या बदल्यात हमासने त्यांच्या ताब्यातील महिला, वृद्ध आणि जखमी ओलिसांना मुक्त करावयाचे प्रस्तावित आहे. दुसऱ्या टप्प्याअंतर्गत गाझातून इस्रायलची पूर्ण माघार, त्या बदल्यात हमासच्या ताब्यातील इस्रायली सैनिक व पुरुष ओलीस व इस्रायलच्या ताब्यातील पॅलेस्टिनी कैद्यांची देवाण–घेवाण प्रस्तावित आहे. तिसऱ्या टप्प्यात मृत इस्रायली ओलिसांचे अवशेष परत करणे आणि उद्ध्वस्त गाझाची फेरउभारणी करण्यासाठी कार्यक्रमाची अंमलबजावणी प्रस्तावित आहे.

सुरुवातीस म्हटल्याप्रमाणे, हा काही पहिलावहिला प्रस्ताव नाही. यापूर्वीही एकदा युद्धविरामाच्या प्रस्तावावर अंमलबजावणी सुरू झाली होती. पण नंतर ती खोळंबली. कारण हमासच्या शोधात निघालेल्या इस्रायली फौजांनी एकामागोमाग एक गाझाच्या शहरांवर हल्ले करणे सुरूच ठेवले. 'हमासचा पूर्ण नि:पात' झाल्याशिवाय थांबणार नाही, अशी फुशारकी इस्रायली पंतप्रधान बिन्यामिन नेतान्याहू मारत राहिले आणि इस्रायली फौजांच्या वरवंट्याखाली हकनाक जीवितहानी नि अतोनात मत्ता व वित्तहानी होतच राहिली. परंतु त्या वेळच्या आणि आताच्या परिस्थितीमध्ये आमूलाग्र बदल झाला आहे. इतक्या कारवाया करूनही हमासचे नेतृत्व शाबूत आहे, पण इस्रायली ओलिसांची सुटका मात्र म्हणाव्या त्या वेगाने होऊ शकलेली नाही. एक साधी आकडेवारी यासंदर्भात उद्बोधक ठरते. ओलिसांच्या सुटकेसाठी इस्रायली कारवाईत केवळ सातच जणांची मुक्तता करता आली. याउलट युद्धविरामादरम्यान वाटाघाटींच्या माध्यमातून १०९ ओलीस इस्रायलला परतू शकले. तेव्हा हमासला धडा शिकवणे आणि ओलिसांची मुक्तता यांपैकी कोणती बाब नेतान्याहूंच्या प्राधान्यक्रमात वर आहे, याची कल्पना येते. हमासच्या ताब्यात अजूनही १२४ ओलीस असावेत आणि यातील कित्येक मरण पावले असावेत, असा अंदाज आहे. परंतु या भानगडीत गाझातील संघर्षामध्ये दररोज जवळपास ५० नागरिक मरण पावत आहेत. तसेच, आश्रयास आलेल्या काही हजारांना वेळेत अन्न व औषधपुरवठा दुष्कर झाला आहे. कारण इजिप्त सीमेवरील आगमनबिंदूंची इस्रायलने नाकेबंदी केली आहे. बायडेन यांनी ३१ मे रोजी युद्धविराम प्रस्तावाची वाच्यता केली. त्यानंतरचे काही दिवस नेतान्याहू सारवासारव करत आहेत. कारण मुळात इतक्या घाईने तो अमेरिकेकडून जाहीर होईल, अशी नेतान्याहूंना कल्पना नव्हती. पण तो झाला आणि त्यांचीच पंचाईत झाली. कारण त्यांच्या आघाडीतील किमान दोन पक्षांना या क्षणी युद्धविरामच मान्य नाही. नुकताच आणीबाणी सरकार आणि युद्ध मंत्रिमंडळातील एक सदस्य बेनी गांत्झ यांनी राजीनामा दिला. त्या सरकारमधील संरक्षणमंत्री योआव गॅलंट – जे नेतान्याहू यांच्याच लिकुड पक्षाचे आहेत – यांनी मध्यंतरी राजीनाम्याचा इशारा दिला होता. गॅलंट आणि गांत्झ यांच्या मागणीत समान सूत्र होते. ते म्हणजे, गाझाच्या पुनर्बांधणीबाबत इस्रायलची योजना काय? या प्रश्नावर नेतान्याहूंकडे उत्तर नव्हते आणि बहुधा नजीकच्या भविष्यात असण्याची शक्यता नाही. नेतान्याहूंच्या आघाडी सरकारमधील कडवे यहुदी पक्ष हमासविरोधी कारवाईबाबत आजही हट्टाग्रही आहेत. इस्रायलने लेबनॉनमधील हेझबोलाविरुद्धही आघाडी उघडावी अशा टोकाच्या मताचे ते पक्ष आहेत. पण त्यांच्या पाठिंब्याशिवाय नेतान्याहू तेथील कायदेमंडळात (क्नेसेट) बहुमत गमावतात. युद्ध मंत्रिमंडळ किंवा आणीबाणी सरकारमधून गांत्झ यांच्यासारख्या विरोधी पक्षीयाने राजीनामा देणे वेगळे आणि उजव्या पक्षांनी सरकारमधूनच बाहेर पडणे वेगळे. गांत्झ यांना राजकीय लढाई इस्रायलच्या कायदेमंडळात न्यायची आहे. उद्या जर निवडणुका झाल्याच, तर नेतान्याहूंचा मोठा पराभव होईल आणि गांत्झ यांच्या नॅशनल युनिटीला सरकारस्थापनेची संधी मिळेल, असा अंदाज इस्रायलमधील बहुतेक जनमत चाचण्या वर्तवतात. नेतान्याहू हे जाणून आहेत. त्यामुळेच त्यांना संघर्ष लांबवायचा आहे.

याविषयी दस्तुरखुद्द बायडेन यांनीच खडे बोल सुनावल्यामुळे नेतान्याहूंसमोर फार पर्याय नाहीत. अमेरिका हा इस्रायलचा जुना दोस्त. ती दोस्ती निभावताना बायडेन यांनी या संघर्षादरम्यान नेतान्याहूंवर वेळ पडेल तेव्हा टीका करणेही सोडलेले नाही. दोघांमध्ये फार सख्य नाही. बायडेन यांचे पूर्वसुरी डोनाल्ड ट्रम्प यांनी पॅलेस्टाइन कराराच्या नावाखाली सहमती आणि सहअस्तित्वाच्या तत्त्वांचेच मातेरे केले. ते नेतान्याहूंच्या पथ्यावर पडले होते. परंतु बायडेन यांच्यावर तेच धोरण पुढे रेटण्याचे बंधन नाही. अमेरिका–अरब–इस्रायली मैत्रीतून नव्हे, तर पॅलेस्टिनींच्या राजकीय आणि आर्थिक स्थैर्यातून या भागातील प्रश्न सुटेल असे बायडेन आणि अमेरिकेचे माजी अध्यक्ष बराक ओबामा यांचे मत होते आणि आहे. ती प्रक्रिया ओबामांच्या काळात सुरू झाली होती. तिच्याकडे पुन्हा वळायचे तर प्रथम संघर्षाला विराम द्यावा लागेल. बायडेन यांच्यासाठी ते राजकीयदृष्ट्याही महत्त्वाचे आहे, कारण विद्यमान वर्ष हे अध्यक्षीय निवडणुकीचे आहे. गाझा संघर्षात हजारोंच्या बळींचे पाप हमासच्याही माथी फोडावे लागेल. पॅलेस्टिनी ॲथॉरिटी या नेमस्त संघटनेला आक्रमक पर्याय म्हणून ही संघटना उभी राहिली. पण गाझावासीयांच्या जीवितापेक्षाही स्वत:च्या राजकीय अस्तित्वाचीच यांनाही पडलेली आहे. गाझा संघर्ष सुरू राहून, अधिकाधिक विध्वंस घडल्यानंतर वाटाघाटींमध्ये अधिक लाभ पदरात पाडून घेता येतील, हा हमासचा हिशोब आहे. हिंसक तोडग्यांना मर्यादा असतात आणि एका मर्यादेपलीकडे सर्वसामान्यांकडून या मार्गाला सहानुभूती मिळत नाही. कारण बहुतेकदा हिंसक कारवाया करणारे वेगळे आणि भोगणारे निराळेच असतात. १२०० इस्रायलींचा काटा काढून नेतान्याहूंना धडा शिकवल्याची फुशारकी हमासचे नेते मारत असतील, तर त्याबद्दल कित्येक पट अधिक हानी गाझावासीयांची झाली, हे ते कसे नाकारणार? त्यांना फूस लावण्यात जितके इराणी नेतृत्व जबाबदार, तितकेच हमासला नियंत्रणात ठेवण्यात अरब नेते हतबल.

# विद्यापीठ अनुदान आयोगाला झाले तरी काय?

भारतातील शिक्षण व्यवस्थेसमोरील प्रश्न जगातील अन्य कोणत्याही देशापेक्षा वेगळे आणि गुंतागुंतीचे आहेत. प्रचंड मोठी विद्यार्थीसंख्या, अनेक भाषा, गुणवत्तेचे असमान परीक्षण, उपलब्ध संधी आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे शिक्षणाचा दर्जा. या जटिल प्रश्नांना सामोरे जाण्यासाठी आवश्यक विचारशक्तीचा अभाव असल्यामुळे विकसित देशांतील शिक्षणव्यवस्थेचे अनुकरण करत आपण कसे प्रगत होत चाललो आहोत, हे दाखवण्याची स्पर्धाच दिसून येते. देशातील महाविद्यालयांमध्ये वर्षातून दोनदा प्रवेश देण्याची मुभा देणारा विद्यापीठ अनुदान आयोगाचा (यूजीसी) निर्णय या प्रकारातील आहे. वर्षातून एकदा प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांसाठी पुरेशी व्यवस्था नसताना अशा प्रकारे दोन वेळा प्रवेश देणे, म्हणजे दोन समांतर महाविद्यालये चालवणे आहे, याचे भान विद्यापीठ अनुदान आयोगाला असायला हवे. तसे ते नसल्याने असे आत्मघातकी निर्णय घाईघाईने घेऊन आधीच कमकुवत होत चाललेल्या शिक्षणव्यवस्थेला खिळखिळे करण्याचाच हा प्रयत्न आहे. यूजीसीचे अध्यक्ष प्रा. एम. जगदेशकुमार यांनी याबाबत दिलेल्या स्पष्टीकरणानुसार आता देशातील महाविद्यालये आणि विद्यापीठांमध्ये वर्षातून दोनवेळा प्रवेश प्रक्रिया राबवणे शक्य होणार आहेत. त्यामुळे शैक्षणिक वर्ष सुरू होताना, म्हणजे जुलै–ऑगस्ट आणि शैक्षणिक वर्षाच्या दुसऱ्या सत्रात म्हणजे जानेवारी फेब्रुवारीमध्येही प्रवेश प्रक्रिया राबवली जाऊ शकणार आहे. ही व्यवस्था ऐच्छिक असली, तरी येत्या काळात त्याबद्दल आदेश निघणारच नाही, अशी हमी देता येणार नाही.




साधारणपणे जुलैमध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना पहिल्या सत्रात जो अभ्यासक्रम शिकवला जाईल, तोच अभ्यासक्रम दुसऱ्या सत्रात पुन्हा नव्याने प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांसाठी शिकवण्याची व्यवस्था करावी लागेल. असे करताना पहिल्या सत्रातील विद्यार्थ्यांना दुसऱ्या सत्रात पुढील अभ्यासक्रम शिकवणे भाग पडणार आहे. म्हणजे अध्यापकांना पहिल्या आणि दुसऱ्या सत्रात एकच अभ्यासक्रम शिकवत असतानाच, दुसऱ्या सत्रातील पुढील अभ्यासक्रमही शिकवावा लागणार आहे. माध्यमिक स्तरावर दिवसशाळेबरोबरच रात्रशाळा भरवल्या जातात. रात्रशाळेची व्यवस्था समांतर असते. आता महाविद्यालयांमध्ये जानेवारीत नव्याने आलेल्या विद्यार्थ्यांबरोबरच आधीच, मागील वर्षी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांनाही शिकवण्याची व्यवस्था करावी लागेल. म्हणजे अध्यापकांवरील ताण वाढेल किंवा नव्याने अध्यापकांची भरती करावी लागेल. अध्यापकांच्या आहेत त्या जागाही पूर्णपणे भरल्या जात नसताना, नवी भरती स्वप्नवतच! मग हे दोन वर्ग भरवणे व्यावहारिकदृष्ट्या शक्य होईल का? ज्या विद्यार्थ्यांना जुलै–ऑगस्टमध्ये प्रवेश घेता येऊ शकत नाही, त्यांना नंतरच्या सत्रात प्रवेश घेता येईल, अशी ही व्यवस्था. म्हणजे एकाच वर्षात दोन शैक्षणिक वर्षे. एक जुलै– ऑगस्टमध्ये सुरू होणारे आणि दुसरे जानेवारी फेब्रुवारीमध्ये. म्हणजे एकाच अभ्यासक्रमाच्या दोन परीक्षा. आधीच जगडव्याळ असलेल्या भारतीय शिक्षणव्यवस्थेला हे सारे झेपेल काय?

देशभरात सुमारे अकराशे विद्यापीठे, सुमारे ४४ हजार महाविद्यालये, ११ हजार स्वतंत्र संस्था, सव्वाचार कोटी विद्यार्थी, १६ लाख अध्यापक. एवढा प्रचंड पसारा असणाऱ्या शिक्षणावर देशाच्या अर्थसंकल्पातील खर्चाची टक्केवारी फक्त तीन टक्के. तोही पूर्ण खर्च होताना दिसत नाही. अशा परिस्थितीत विद्यापीठे आणि महाविद्यालये यांना दोनदा प्रवेश देण्याची सूचना करणे आत्मघातकी ठरू शकते. अशा दोन समांतर व्यवस्थांसाठी यूजीसीकडून अधिक निधी उपलब्ध करून दिला जाईल किंवा नाही, याबाबत प्रा. जगदेशकुमार यांनी मौन बाळगले आहे. प्रगत देशांत अशी दोन सत्रांत प्रवेश देण्याची पद्धत अस्तित्वात आहे, म्हणून ती भारतातही लागू करण्याची इच्छा चांगली असली, तरी त्यासाठी आपली व्यवस्था सक्षम आहे की नाही, याचा विचार न करता व्यवस्थेवर ताण वाढविल्याने शैक्षणिक गुणवत्तेचेच नुकसान होईल. ते परवडणारे नाही. विद्यार्थ्यांचे वर्ष वाया जाऊ नये, म्हणून अशी व्यवस्था करायला हवी असेल, तर त्यासाठी यंत्रणेचा आणि व्यवस्थेचा आधी विस्तार करावा लागेल. आहे त्याच यंत्रणेचा उपयोग करून वर्षात दोनवेळा तोच अभ्यासक्रम शिकवायला लावणे, अन्यायकारक ठरणारे आहे.

जगातील सर्व प्रगत देशांत शिक्षणावर होणारा खर्च पाहता, भारताला खरेतर मान खाली घालावी लागेल. उत्तम शिक्षण देणाऱ्या जगातील शिक्षणसंस्थांच्या यादीत भारतीय संस्थांचा क्रमांक किती खाली आहे, हे यावरून स्पष्ट होईल. गरज आहे, ती शैक्षणिक दर्जा सुधारण्याची आणि त्यासाठी व्यवस्थेत आवश्यक बदल करण्याची. सत्ताधाऱ्यांना शिक्षणावरील खर्च अनुत्पादक वाटतो, त्यामुळे त्यात भरीव वाढ करण्याची गरज वाटत नाही, मात्र त्याचवेळी या व्यवस्थेवरील आपला अंकुश ढिला होऊ न देण्याची काळजीही घेणे आवश्यक वाटते. अशा स्थितीत पदवी शिक्षणाचा फज्जा उडणार नाही, याच विश्वास विद्यार्थ्यांमध्ये निर्माण करण्यास प्राधान्य द्यायला हवे.

# जागा मिळाल्या, जनादेश नाही

भाजपने '४०० पार'चा दावा केला होता. प्रत्यक्षात एनडीएला ३०० आणि भाजपला २५० जागांपर्यंतही पोहोचता आले नाही. हा भाजपचा राजकीय आणि मोदींचा वैयक्तिक पराभव आहे.



स्वतंत्र भारताच्या इतिहासातील ही सर्वात कमी मुक्त तसेच निष्पक्ष अशी लोकसभा होती. या निवडणुकीत सगळेच वातावरण विरोधी पक्षांच्या विरोधात उभे होते. पैसा, प्रसारमाध्यमे, प्रशासकीय यंत्रणा हे सगळे हातात असल्यामुळे सत्ताधारी पक्षाचे पारडे विरोधी पक्षांच्या तुलनेत चांगलेच जड होते. चला, एका प्राथमिक फरकाने सुरुवात करू या. निवडणुकीनंतर कुणाकडे संख्याबळ आहे आणि कुणाकडे जनादेश आहे, या दोन वेगवेगळ्या गोष्टी आहेत. कुणाकडे किती जागा आहेत, कुणाकडे बहुमत आहे आणि त्यानुसार कोण सरकार बनवणार हे एक साधे अंकगणित आहे. एखाद्या पक्षाने किंवा आघाडीने मिळवलेल्या जागांची बेरीज विधिमंडळात बहुमत सिद्ध करण्यासाठी जमेत धरता येते का, सत्ता स्थापन करण्याचा दावा करणाऱ्याला सरकार स्थापन करण्याचा कायदेशीर अधिकार असतो का, यावरून संख्याबळाबाबत तर्क करता येतात.

जनादेशाबाबत सांगायचे तर त्यात आकड्यांच्या पलीकडे जाऊन त्याबाबतच्या गुंतागुंतीचे विश्लेषण अपेक्षित असते. निवडणुकीत लोकांनी कोणाकडे कल दाखवला आहे, सरकारला जनादेश दिला आहे का या प्रश्नात त्याचे उत्तर मिळते. जागा आणि जनादेश या दोन्हींमध्ये असलेल्या फरकातून २०२४ च्या निकालांचे स्पष्टीकरण मिळते. ते असे की भाजपकडे सरकार स्थापन करण्यासाठी संख्याबळ आहे, पण त्यांच्याकडे जनादेश नाही.आजवरची उदाहरणे पाहता, राष्ट्रपतींनी भाजपच्या संसदीय पक्षाच्या नेत्याला सरकार स्थापन करण्यासाठी आमंत्रित करायला हवे. एनडीएला नवीन लोकसभेत विश्वासमत जिंकून (खरेतर ती आता एक औपचारिकताच उरलेली आहे) पुढचे सरकार बनवण्यासाठी कोणताही घटनात्मक किंवा कायदेशीर अडथळा नाही.

जनादेशाचे तीन मापदंड जनादेशाचा राजकीय अर्थ आपल्याला एका वेगळ्या निष्कर्षापर्यंत घेऊन जातो. जनादेशाचा अर्थ लावण्यासाठी एका अवघड प्रश्नाचे उत्तर द्यावे लागेल. तो प्रश्न म्हणजे तिसऱ्यांदा भाजप सरकारचे नेतृत्व करण्यासाठी नरेंद्र मोदींच्या नेतृत्वाला ६० कोटींहून अधिक मतदारांनी मान्यता दिली आहे का? या निवडणुकीत भाजपला जनादेश मिळाला की नाही हे मोजण्यासाठी येथे तीन सोपे मापदंड आहेत. एक म्हणजे, २०१४ आणि २०१९ या दोन्ही निवडणुकांमध्ये भाजपला स्पष्ट बहुमत मिळाले होते. त्या दोन निवडणुकांमधील कामगिरीच्या तुलनेत भाजपची या वेळची कामगिरी कशी झाली? दोन, भाजपने स्वत:च केलेले दावे आणि त्याच्या स्वत:च्या मोठमोठ्या अपेक्षा यांच्या आरशात भाजप स्वत: कसा दिसतो? तीन, एकूणच राजकीय संदर्भात या निवडणुकीत भाजपची कामगिरी कशी दिसते?

नैतिक, राजकीय, वैयक्तिक पराभव पहिली गोष्ट म्हणजे, आपल्याला जनादेश मिळाला आहे, हा जनादेशाचा दावा पुरेसा स्पष्ट नाही. मतदानाच्या शेवटच्या दिवशी याच वर्तमानपत्रामध्ये मी भाजपच्या कामगिरीचे मोजमाप करण्यासाठी खालील तीन निकष सुचवले होते: भाजपला ३०३ हून जास्त जागा मिळाल्या तर तर तो त्यांचा निर्विवाद विजय असला असता. ३०० पेक्षा एकही जागा कमी झाली असती तर तो त्यांचा नैतिक पराभव ठरला असता; २७२ पेक्षा कमी जागा मिळाल्या असत्या तर तो भाजपचा राजकीय पराभव ठरला असता आणि २५० च्या खाली जागा मिळणे हा मोदींचा वैयक्तिक पराभव ठरला असता. त्या सूचनेत काही योग्यता असेल तर, ज्यांच्या नावावर निवडणूक लढवली गेली, त्यांचा हा नैतिक, राजकीय आणि वैयक्तिक पराभव आहे. या निवडणुकीत भाजपने ६३ जागा गमावल्या आणि बहुमताच्या आकड्यापासून ते ३२ जागांनी मागे राहिले. त्यांच्या मतांच्या टक्केवारीतील घट मात्र अगदी नगण्य आहे. भाजपची मते ३७.४ टक्क्यांवरून ३६.६ टक्क्यांवर आली आहेत. परंतु भाजपच्या देशभर मिळालेल्या एकूण जागा आणि मते यांचे आकडे एकत्र केले की चित्र अधिक स्पष्ट होते. भाजपच्या देशभरातील जागा आणि मतांमध्ये घट झाली (अनुक्रमे ८३ जागा ३.६ टक्के मते) असली तरी केरळपासून ओडिशापर्यंतच्या दक्षिण–पूर्व किनारपट्टीच्या पट्ट्यात भाजपच्या जागा आणि मतांच्या टक्केवारीचे प्रमाण (२० जागा आणि ९.३ टक्के मते) वाढल्यामुळे ही घट थोडी तरी सुसह्य झाली आहे. पण म्हणून भाजप किंवा एनडीएचे समर्थन करणे हे १९८९ मधील अपमानास्पद पराभवानंतर काँग्रेसने जसा पराभव झाला असला तरी आपणच सर्वाधिक जागा मिळवणारा पक्ष असल्याचा दावा केला होता, तसेच होईल.

भाजपने या निवडणुकीत '४०० पार'चा दावा केला होता. भाजपने स्वत:नेच केलेल्या या दाव्याच्या संदर्भात पाहिले तर सत्य अधिक कठोर दिसते. भाजपने स्वत:बद्दल केलेली ही भविष्यवाणीच त्या पक्षाची निवडणूक मोहीम तसेच भाजपधार्जिण्या वृत्तपत्रांचे मथळे, भाजपचे निष्ठावंत टीव्ही अँकर आणि एक्झिट पोलमध्ये भाजपला जादूई ४०१ जागा देणारे ओपिनियन पोल यांचा केंद्रबिंदू होती. मोदींच्या प्रचारामुळे भाजपच्या मतांमध्ये किती वाढ झाली (राष्ट्रीय पातळीवर किमान दोन ते तीन टक्के असा माझा अंदाज आहे) हे आपल्याला कधीच कळणार नाही. पण आपल्याला हे माहीत आहे की असे असूनही एनडीए ३०० पार करू शकला नाही. त्यामुळे भाजपने मागितलेला आणि त्यांना अपेक्षित असलेला जनादेश त्यांना मिळाला नाही, असे म्हणणे रास्त आहे.

विरोधकांसाठी प्रतिकूल वातावरण हे दोन निकष असे गृहीत धरतात की २०२४ ही एक नेहमीसारखीच निवडणूक होती. तिथे दोन वेळा सत्ताधारी असलेला पक्ष तिसऱ्यांदा आपल्यालाच सत्ता मिळावी यासाठी सगळे नियम पाळून, विरोधकांना बरोबरीचे मानत, तशी वागणूक देत तिसऱ्या वेळेसाठी आपले नशीब अजमावत होता. पण सगळ्यांनाच माहीत आहे की तशी परिस्थिती नव्हती.

या निवडणुकीत वातावरण विरोधी पक्षांना जराही अनुकूल नव्हते. निवडणूक आयोग उघड उघड पक्षपाती होता. आणि तरीही जनतेने सत्ताधाऱ्यांना जोरदार दणका दिला. हे १९७७ या वर्षाची आठवण करून देणारे आहे. तेव्हा काँग्रेसविरुद्ध जनादेश असला तरी इंदिरा गांधींनी दक्षिणेत विजय मिळवला होता. माझ्या एका मित्राने या लढतीला गोलियथ आणि डेव्हिड या लोककथेची उपमा दिली आहे. तो म्हणतो की 'ही तगडा गोलियथ विरुद्ध दुबळा डेव्हिड अशी स्पर्धा होती आणि डेव्हिडने गोलियथच्या नाकी नऊ आणले'. या निवडणुकीत भाजपचा पराभव झाला आहे, असा दावा करणे मूर्खपणाचे असले तरी, भाजप आणि मोदींचा पराभव झाला हे नाकारणे शहामृगासारखे ठरेल. त्यांच्याकडे संसदेत संख्याबळ आहे, परंतु त्यांना हवा असलेला जनादेश नाही.

त्याबाबत कोणताही संभ्रम नको. या निवडणुकीतून सर्वोच्च नेत्याला प्रजासत्ताकाची एक एक वीट काढत ते खिळखिळे करण्यासाठी आणि देशाच्या घटनात्मक लोकशाहीच्या प्रस्तावित विकृतीकरणाला मान्यता हवी होती. भारतीय जनतेने त्यांना हा अधिकार देण्यास नकार दिला. स्पर्धा अधिक न्याय्य असती तर खरे तर त्यांना विरोधी पक्षातच बसावे लागले असते. शेवटी त्यांना हवी होती ती खुर्ची त्यांनी मिळवलीच, पण जनतेने त्यांना हवा असलेला नैतिक अधिकार, प्रतिष्ठा, वैधता नाकारली आहे.

# ब अक्षरवरून मुलींची नावे व अर्थ



बेला – सुंदर फुल, बेलफळ, सुंदर बहुगंधा – चाफेकळी, सुंदर, सुगंधित बासरी – श्रीकृष्णाचे आवडते वाद्य, गोड , मधूरबिंदी – टिकली बानी –पृथ्वी, सरस्वती देवी बिपाशा – नदी, वाहते पाणी बिशाखा – एक तारा बिंबा – कुंकू, चंद्रकला बर्फी – एक गोडाचा प्रकार बागेश्री – संगीतातील रागाचा एक प्रकार बिजली – वीज, चमचमणारी बिंबी – चमकदार, चमचमणारी बरखा – पाऊस, विजांसह पडणारा पाऊस बिजल – वीज, लाईटनिंग बान्ही – आग, अग्नीबविष्या – भविष्यकाळ बहुला – गायीचे नाव बारुणी – माता दुर्गेचे नाव भद्रा – चांगले, चांगली बिन्नी – सफेद, रुप ब्रायन – मजबूत बरवा – संगीतातील एक राग बिल्बा – बेलाचे झाड बीनल – वीणा,एक वीणा बिजुल – अशोक वृक्ष बन्सी – बासुरी बिनीता – एकदम चपखल ब्रिती – ताकद बेलीका – बेलाचे फळ बहुगंधा – विविध सुंगध असलेली ब्रिजबाला – निसर्गाची देवता बकुळ– एक सुगंधित फुल बुलबुल – एक पक्षी बसाबी – देव इंद्राची बायको बबिता – लहान मुलगी बिमला – शुद्ध बोधी – मनोरंजन ब्रिंदा – राधा, राधेचे एक नाव ब्राम्हणी – देव ब्रम्हाची बायको बिजाली – प्रकाशित, वीज, लाईटनिंग बनमाला – फुलांचा गुच्छा बंधुरा – सुंदर, आकर्षक बीना – वीणाचा अपभ्रंश,एक वाद्य

# १०वी उत्तीर्णांसाठी भारतीय टपाल विभागाने या पदांसाठी नियुक्ती काढली, वेतन ६३ हजार रुपयांपर्यंत असेल

भारतीय टपाल विभागाने ड्रायव्हरच्या पदांवर नवीन भरतीसाठी जाहिरात प्रसिद्ध केली आहे. १०वी पास उमेदवार यासाठी अर्ज करू शकतात. ड्रायव्हरच्या पदासाठी उमेदवारांना ऑफलाइन पद्धतीने अर्ज करावा लागेल. या भरतीसाठी अर्ज भरण्यास ३ जूनपासून सुरुवात झाली असून, शेवटची तारीख २३ जुलै ठेवण्यात आली आहे. या पदासाठी अर्ज करण्याचे इतर तपशील आम्हाला कळवा.

शैक्षणिक पात्रता जाणून

या पदांसाठी अर्ज करणाऱ्या उमेदवारांनी मान्यताप्राप्त शाळा किंवा संस्थेतून दहावी उत्तीर्ण केलेली असावी. त्यांना ऑटोमोबाईल अभियांत्रिकी क्षेत्राची माहिती असावी. उमेदवारांना मोटार वाहन चालविण्याचा किमान ३ वर्षांचा अनुभव असावा आणि शक्यतो होमगार्ड किंवा नागरी स्वयंसेवक म्हणून ३ वर्षांची सेवा असावी.




वयोमर्यादा या पदांसाठी अर्ज करणाऱ्या उमेदवारांचे कमाल वय ५६ वर्षे असावे. त्यानंतरच ते अर्ज करण्यास पात्र ठरतात.

पगार

इंडिया पोस्टमधील निवड प्रक्रिया पूर्ण केल्यानंतर वेतन दिले जाईल. निवडलेल्या उमेदवारांना लेव्हल २ अंतर्गत १९,९०० रुपये ते ६३,२०० रुपये पगार मिळेल.

सूचना वाचा भारतीय पोस्ट जॉबसाठी अर्ज करणाऱ्या उमेदवारांनी प्रथम अधिकृत अधिसूचना काळजीपूर्वक वाचली पाहिजे. त्यानंतर, कृपया सर्वकाही काळजीपूर्वक वाचा आणि फॉर्म भरा.

# तासन्तास टॉयलेटमध्ये बसत असाल तर दह्यात मिसळून खा या ५ गोष्टी




बद्धकोष्ठतेची समस्या आजकाल खूप सामान्य झाली आहे. चुकीच्या खाण्याच्या सवयी, ताणतणाव, कमी पाणी पिण्यामुळे पोट साफ होत नाही आणि तासन्तास टॉयलेटमध्ये बसावे लागते. पण काळजी करू नका, दह्यासोबत काही गोष्टी खाल्ल्याने तुमची आतडे स्वच्छ होतील आणि बद्धकोष्ठतेपासून आराम मिळेल.

दही पचनाचा जादू : दही पचन सुधारण्यासाठी ओळखले जाते. यामध्ये असलेले प्रोबायोटिक्स आतड्यांमधील चांगले बॅक्टेरिया वाढवतात, ज्यामुळे पचन सुधारते आणि बद्धकोष्ठता दूर होते.

दह्यासोबत या गोष्टी खा.

१. अक्रोड: अक्रोडमध्ये भरपूर फायबर असते जे मल मऊ करते आणि पोट साफ करण्यास मदत करते. २. बदाम: फायबरसोबतच बदामामध्ये मॅग्नेशियम देखील असते ज्यामुळे बद्धकोष्ठतेपासून आराम मिळतो.

३. सूर्यफूल बिया: सूर्यफुलाच्या बियांमध्ये फायबर आणि ओमेगा –३ फॅटी ॲसिड असतात जे पचन सुधारतात. ४. चणे: चणे फायबर आणि प्रोटीनने समृद्ध असतात जे आतडे निरोगी ठेवण्यास मदत करतात.

५. पालक: पालकमध्ये फायबर, जीवनसत्त्वे आणि खनिजे असतात जे पचन सुधारतात. दह्यासोबत या गोष्टी खाण्याचे फायदे बद्धकोष्ठता पासून आराम आतडे साफ करणे पचन सुधारणे शरीराला आवश्यक पोषक तत्वांचा पुरवठा लक्षात ठेवा: दह्यासोबत या गोष्टींचे नियमित सेवन करा. तुम्हाला कोणत्याही गोष्टीची ॲलर्जी असल्यास ते घेण्यापूर्वी डॉक्टरांचा सल्ला घ्या. पुरेसे पाणी पिणे देखील महत्त्वाचे आहे. या सोप्या उपायांचा अवलंब करून तुम्ही बद्धकोष्ठतेच्या समस्येपासून मुक्त होऊ शकता आणि निरोगी आयुष्य जगू शकता.

# एम.एस.बिडवे अभियांत्रिकी महाविद्यालयाला एआयसिटी अंतर्गत नवीन अकरा अभ्यासक्रमास मान्यता

लातूर :– श्री महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्था, लातूर द्वारा महात्मा बसवेश्वर महाविद्यालय, लातूर, एम.एस. बिडवे अभियांत्रिकी महाविद्यालय, लातूर, श्री देशीकेंद्र माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, लातूर, श्री महात्मा बसवेश्वर प्राथमिक विद्यामंदिर व बालक मंदिर, लातूर, श्री शंभुलिंग शिवाचार्य प्राथमिक आणि माध्यमिक विद्यालय, लातूर, शिवाचार्य प्राथमिक विद्यालय, लातूर, श्री निळकंठेश्वर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, लातूर, कॉलेज ऑफ फार्मसी, लातूर, अल्लमप्रभू कॉलेज ऑफ फार्मसी, लातूर, अभियांत्रिकी महाविद्यालय अंबाजोगाई, जि. बीड, कै. पूज्य टी.बी. गिरवलकर तंत्रनिकेतन महाविद्यालय, अंबेजोगाई जि. बीड अशा विविध शाळा, अभियांत्रिक आणि कला, वाणिज्य, विज्ञान, समाजकार्य, संगणकशास्त्र, व्यावसायिक महाविद्यालये चालविले जातात. एम.एस.बिडवे अभियांत्रिकी महाविद्यालय हे मराठवाड्यातील एक नामवंत आणि गुणवंत विद्यार्थी घडविणारे एकमेव महाविद्यालय आहे. या महाविद्यालयाची सुरुवात सन १९८३ रोजी झाली असून सुरुवातीला सिव्हिल, मेकॅनिकल, इलेक्ट्रॉनिक्स आणि इलेक्ट्रिकल हया विद्याशाखा होत्या. त्यानंतर सिव्हिल, मेकॅनिकल, इलेक्ट्रॉनिक्स आणि कम्प्युटर या पदव्युत्तर अभ्यासक्रमाची सुरुवात केली. तसेच विद्यार्थ्यांचा कॉम्प्युटर क्षेत्राकडे वाढता ओढा पाहून मास्टर इन कॉम्प्युटर एप्लीकेशन (एमसीए) हा अभ्यासक्रम सुद्धा सुरू करण्यात आला. शैक्षणिक वर्ष २०२४–२५ मध्ये या महाविद्यालयात डिप्लोमा इन सिव्हील इंजिनिअरिंग, डिप्लोमा इन मेकॅनिकल इंजिनिअरिंग, डिप्लोमा इन इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंग, डिप्लोमा इन इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलीकम्युनिकेशन इंजीनियरिंग, डिप्लोमा इन कॉम्प्युटर सायन्स अँड इंजीनियरिंग, डिप्लोमा इन इन्फॉर्मेशन




टेक्नॉलॉजी, मास्टर ऑफ बिझनेस ॲडमिनिस्ट्रेशन (एमबीए) इन फायनान्स, मास्टर ऑफ बिझनेस ॲडमिनिस्ट्रेशन (एमबीए) इन मार्केटिंग अँड फायनान्स, बॅचलर ऑफ टेक्नॉलॉजी सी.एस.इ.(एआयएमएल), आर्किटेक्चरल असिस्टंटशिप आणि बॅचलर ऑफ कॉम्प्युटर अप्लीकेशन (बीसीए) अशा एकूण अकरा नवीन अभियांत्रिकी विषयाला अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, (ए.आय.सी.टी.इ.), नवी दिल्ली या संस्थेद्वारे मंजुरी मिळाली आहे. या सर्व नवीन अभ्यासक्रमाविषयी श्री महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्थेचे अध्यक्ष आदिनाथ सांगवे, उपाध्यक्ष माधवराव पाटील (तपसेचिंचोलीकर), संस्थेचे सचिव माधवराव पाटील टाकळीकर, सहसचिव सुनील मिटकरी, कोषाध्यक्ष विजयकुमार रेवडकर, कार्यकारी संचालक प्रदीप दिंडीगावे, संचालक राजेश्वर बुके, संचालक बस्वराज (राजू) येरटे, संचालक काशिनाथ साखरे, संचालिका ललिता पांढरे, संचालक राजेश्वर पाटील, संचालक बाबुराव तरगुडे, संचालक प्रभूप्पा पटणे, संचालक गुरुलिंग धाराशिवे आणि संचालक महेश हालगे यांनी अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, (ए.आय.सी.टी.इ.), नवी दिल्ली या संस्थेचे आभार मानून महाविद्यालयातील प्राचार्य, शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी, पालक आणि विद्यार्थ्यांचे कौतुक करून पुढील वाटचालीसाठी हार्दिक शुभेच्छा दिल्या आहेत. या नवीन अभ्यासक्रमाच्या माध्यमातून अभियांत्रिकी विषयांमध्ये गुणवान आणि गुणवंत विद्यार्थी घडविले पाहिजे असा आशावादही त्यांनी व्यक्त केला आहे. या नवीन अभ्यासक्रमाला प्रवेश घेण्याचे आवाहन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुरेश हल्लाळी, प्रा. जी.सी. शहाबादे आणि डॉ.एन.एम. हलगरे यांनी केले आहे.

# जिल्हाधिकारी पेरणीसाठी शेतकऱ्यांच्या बांधावर पोहचतात तेव्हा...



जिल्ह्यात यंदा मॉन्सूनच्या सुरुवातीलाच मोठ्या प्रमाणात पाऊस झाल्याने शेतकऱ्यांची पेरणीसाठी लगबग सुरु झाली आहे. पावसाने काहीशी उघडीप दिल्यानंतर सुरु झालेल्या पेरणीची पाहणी करण्यासाठी जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर–घुगे थेट शेतकऱ्यांच्या बांधावर पोहचल्या. शेतकऱ्यांशी संवाद साधून बियाणांची उपलब्धता, खतांचा वापर आणि पेरणीची पद्धती याबाबत माहिती घेतली. यावेळी स्वतः टोकन यंत्र हाती घेवून पेरणीचा अनुभवही त्यांनी घेतला. तसेच बैलजोडीच्या सहाय्याने होत असलेल्या पारंपारिक पेरणीचाही त्यांनी अनुभव घेतला. औसा तालुक्यातील लामजना, तांबरवाडी आणि खारोसा या गावांना भेट देवून जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर–घुगे यांनी पेरणीची पाहणी केली. कृषि विभागामार्फत पेरणीविषयी जनजागृती करण्यात आली असून प्रत्यक्ष पेरणी प्रसंगी शेतकऱ्यांकडून बीजप्रक्रिया, आधुनिक पद्धतीने मोठ्या प्रमाणात पेरणी होत असल्याबद्दल जिल्हाधिकारी यांनी समाधान व्यक्त केले. तसेच यंदा चांगला पाऊस होवून शेतकऱ्यांना भरघोस उत्पन्न मिळावे, अशा शुभेच्छा त्यांनी व्यक्त केल्या. प्रारंभी लामजना येथील केशव शिवहार पाटील यांच्या शेतामध्ये जिल्हाधिकारी यांनी पेरणीची पाहणी केली. कृषि विभागाने केलेल्या मार्गदर्शनानुसार पेरणीपूर्वी बीजप्रक्रिया करण्यात येत असल्याचे शेतकऱ्यांनी यावेळी सांगितले. श्री. पाटील यांच्या शेतामध्ये रुंद वरंबा सरी पद्धतीने टोकन यंत्राच्या सहाय्याने तूर पिकाची पेरणी करण्यात आली. जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर–घुगे यांनीही पेरणीमध्ये सहभागी होत टोकन पद्धतीने पेरणी केली. तांबरवाडी येथील खंडू सूर्यवंशी यांच्या शेतात टोकन यंत्राद्वारे करण्यात येत असलेल्या तूर पेरणीचीही त्यांनी पाहणी केली. तसेच टोकन यंत्रामुळे होणारे फायदे शेतकऱ्यांकडून जाणून घेतले. टोकन यंत्राच्या सहाय्याने पेरणी करण्यात येत असल्याने वेळेत, बियाणांची आणि श्रमाची बचत होत असल्याचे शेतकऱ्यांनी यावेळी सांगितले. कृषि विभागाने जास्तीत जास्त शेतकऱ्यांना टोकन यंत्र उपलब्ध करून देण्यासाठी आवश्यक कार्यवाही करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी यांनी यावेळी दिल्या. बीबीएफ यंत्राच्या सहाय्याने खारोसा येथील शेतकरी बब्रुवान डोके यांच्या शेतात सुरु असलेल्या सोयाबीन पेरणीचीही जिल्हाधिकारी यांनी पाहणी केली. बीबीएफ यंत्राने पेरणी केल्यामुळे शेतकऱ्यांना होत असलेल्या फायद्याची माहिती तालुका कृषि अधिकारी यांनी यावेळी दिली. तसेच तालुक्यात बीबीएफ यंत्राद्वारे पेरणी करणाऱ्या शेतकऱ्यांची संख्या वाढत असल्याचे त्यांनी सांगितले. बीबीएम यंत्राद्वारे पेरणीचे महत्व शेतकऱ्यांना पटवून देवून यासाठी प्रोत्साहन देण्याच्या सूचना जिल्हाधिकारी यांनी दिल्या. यावेळी बैलगाडीमध्ये बसून जिल्हाधिकारी ठाकूर–घुगे खारोसा येथीलच शेषराव मारुती राऊतराव यांच्या शेतात पोहोचल्या. बैलाच्या सहाय्याने पारंपारिक पद्धतीने करण्यात येत असलेल्या सोयाबीन पेरणीचीही जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर–घुगे यांनी पाहणी केली. काही शेतकऱ्यांच्या बांधावर यावेळी जिल्हाधिकारी ठाकूर–घुगे यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. औसा–रेणापूरचे उपविभागीय अधिकारी अविनाश कोरडे, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी आर. टी. जाधव, जिल्हा परिषदेचे कृषि विकास अधिकारी सुभाष चोले, उपविभागीय कृषी अधिकारी दिलीप जाधव यांच्यासह तहसीलदार, तालुका कृषि अधिकारी, संबंधित गावचे सरपंच, तलाठी, ग्रामसेवक, कृषि सहाय्यक यावेळी उपस्थित होते.

# थोड्याशा मलाई पासून निघेल भरपूर तूप, फक्त या गोष्टी ठेवा लक्षात

भारतीय स्वयंपाघरात तूप हे वापरले जाते. पोळी किंवा भाजी, वरण–भात, सर्वानवर तूप टाकतात. तूप फक्त चविष्टच नसते तर आरोग्यासाठी देखील फायदेशीर असते. तर चला आज आम्ही तुम्हाला कमीतकमी मलाईपासून जास्तीतजास्त तूप कसे काढावे हे सांगणार आहोत. तूप करण्यापूर्वी या गोष्टींकडे ठेवावे लक्ष– रात्रीच्या मलाईमध्ये दही घालावे. सकाळ पर्यंत मलाई पूर्णपणे जमून जाईल. आता तुम्ही तूप बनवण्यासाठी तयार आहात, अनेक महिला खूप मलाई अनेक दिवसांपर्यंत साठवून ठेवतात यामुळे तिला वास यायला लागतो तर असे न करता रात्रीच ताजी



मलाई दही मध्ये मिक्स करावी. तसेच आता मदतीला बर्फ घ्यावा. बर्फाच्या मदतीने तुम्ही मलाईमधून खुपसारे तूप काढू शकाल. रात्री जमवलेल्या मलाईला मिक्सरमध्ये घालावे. त्यामध्ये बर्फाचे पाणी मिक्स करत जा. तुम्ही पाहाल की लोणी निघण्यास सुरवात होईल. या लोणीमध्ये थोडे बर्फाचे तुकडे घालावे. यामुळे लोणीचे प्रमाण वाढेल. ही टीप खासकरून उन्हाळ्यात महत्वाची आहे. आता लोणीला ताकापासून वेगळे करावे. आता लहान गॅस वर कढईमध्ये हे घालावे व अर्ध्या तासाकरिता ठेवावे तसेच मधूनमधून चमच्याने हलवत रहा. कलर थोडा बदलल्या नंतर गॅस वरून खाली काढावे. व चाळणीच्या मदतीने गाळून मग डब्यामध्ये भरावे.

# काही मिनिटांतच काळी मान चमकेल, फक्त हे ५ घरगुती उपाय करा

मान काळे होणे ही एक सामान्य समस्या आहे जी अनेकांना त्रास देते. सूर्यप्रकाश, प्रदूषण, स्किनकेअरची चुकीची दिनचर्या आणि हार्मोनल बदल ही त्याची प्रमुख कारणे आहेत. पण घाबरू नका, कारण काळी मान दूर करण्यासाठी अनेक सोपे आणि प्रभावी घरगुती उपाय आहेत.१. लिंबू आणि मधाची जादू: लिंबूमध्ये असलेले सायट्रिक ॲसिड एक नैसर्गिक ब्लीचिंग एजंट आहे जे काळेपणा कमी करण्यास मदत करते. मध त्वचेला मॉइश्चरायझ करते आणि मऊ बनवते. लिंबाच्या रसात मध मिसळून मानेवर लावा आणि१५–२० मिनिटांनी धुवा. आठवड्यातून २–३ वेळा हा उपाय करून पहा. २. बेसन आणि दह्याचे मिश्रण: बेसन हे एक नैसर्गिक एक्सफोलिएटर आहे जे मृत पेशी काढून त्वचा स्वच्छ करते. दही त्वचेला मॉइश्चरायझ करते आणि मऊ बनवते. बेसन आणि दही एकत्र करून पेस्ट तयार करा आणि मानेवर लावा. १५–२० मिनिटांनी थंड पाण्याने धुवा. आठवड्यातून २–३ वेळा हा उपाय करून पहा.३. टोमॅटोचा चमत्कार: टोमॅटोमध्ये असलेले लाइकोपीन एक शक्तिशाली अँटिऑक्सिडेंट आहे जे त्वचेला नुकसान होण्यापासून वाचवते. टोमॅटो बारीक करून त्याचा रस मानेवर लावा आणि १५–२० मिनिटांनी धुवा. आठवड्यातून २–३ वेळा हा उपाय करून पहा. ४. बटाटाचा चमत्कार: बटाट्यामध्ये असलेले ब्लीचिंग गुणधर्म त्वचा गोरी होण्यास मदत करतात.

# सुधाकर शृंगारे यांच्या पराभवास लातूर जिल्ह्यातील भाजप नेते जबाबदार : संजयभाऊ कांबळे

लातूर : नुकत्याच पार पडलेल्या लोकसभा निवडणुकीत लातूर राखीव लोकसभा मतदार संघातून भाजपने केंद्र तसेच राज्यातून बौद्ध समाजाचे एकमेव उमेदवारी घोषित केलेले सुधाकर शृंगारे यांच्या पराभवास लातूर जिल्ह्यातील भारतीय जनता पार्टीचे नेते जबाबदार असल्याचा आरोप करून भारतीय दलित पँथर्सचे महाराष्ट्र कार्याध्यक्ष संजयभाऊ कांबळे यांनी भाजपच्या वरिष्ठ नेतृत्वाने माजी खासदार सुधाकर शृंगारे यांचे राजकीय पुनर्वसन करण्याची मागणी पत्रकारांशी बोलताना केली . मागच्या पाच वर्षाच्या आपल्या खासदारकीच्या काळात सुधाकर शृंगारे यांनी लातूर लोकसभा मतदार संघाच्या विकासात मौलिक योगदान दिलेले आहे. त्यांनी मतदार संघातील सर्वच समाजाच्या लोकांना सोबत घेऊन खऱ्या अर्थाने राष्ट्रीय एकात्मता साधण्याचे महत्वपूर्ण कार्य केल्याचे सांगून संजयभाऊ कांबळे पुढे म्हणाले की, सुधाकर शृंगारे यांच्याकडे मदतीच्या अपेक्षेने गेलेल्या कोणत्याही व्यक्तीला त्यांनी रिकाम्या हाताने परत पाठविले नाही. मदत, सहकार्य करताना त्यांनी कधीही जात , धर्म, पंथ पाहिला नाही. सर्वांना सोबत घेऊन चालणाऱ्या अशा व्यक्तिमत्वास या मतदार संघातून चक्क उमेदवारीच मिळू नये, यासाठीही भाजपच्या जिल्ह्यातील नेत्यांनी प्रयत्न केल्याचा धक्कादायक आरोपही कांबळे यांनी केला. काँग्रेसचे ज्येष्ठ नेते शिवराज पाटील चाकूरकर यांना २००४ च्या लोकसभा निवडणुकीत काँग्रेसच्याच काही नेत्यांनी पराभूत करून पंतप्रधान पदापासून दूर ठेवले होते. या निवडणुकीत सुधाकर शृंगारे विजयी झाले असते तर केंद्रात नक्कीच मंत्री होणार होते. मात्र, त्यांना मंत्रिपदापर्यंत पोहोचूच द्यायचे नाही, या उद्देशाने भाजप नेत्यांनी शृंगारे यांच्या पराभवाचा पाया रचल्याचा आरोप कांबळे यांनी केला. तसेच लातूर जिल्ह्यात बौद्ध समाजाचा एक नेता राज्य मंत्रिमंडळात मंत्री आहे, आता शृंगारे यांच्या रूपाने या समाजाचा मंत्री नको, या भावनेनेही भाजप नेत्यांनी





शृंगारे यांना विजयापासून रोखल्याचे त्यांनी बोलून दाखविले. शृंगारेच्या पराभवास भाजपचे कोणते नेते जबाबदार आहेत ? असे विचारले असता त्यांनी आ. संभाजी पाटील निलंगेकर यांसह जिल्ह्यातील भाजपचे अनेक नेते जबाबदार असल्याचे सांगितले. सुधाकर शृंगारे यांनी लातूर लोकसभेच्या इतिहासात रेल्वे पिटलाईन मंजुरीसह अनेक विकासकामे केली आहेत. कोरोनाच्या काळातही त्यांनी स्वखर्चाने गोरगरिबांना अन्नधान्याचे किट वाटप करण्याचे काम केले आहे. भाजपच्या सर्व गट - तटातील नेत्यांना सोबत घेऊन चालणाऱ्या शृंगारे यांचा मूळ पिंडच सेवाभाव जोपासणारा होता. आपल्या समाजासह सर्वच समाज बांधवांशी त्यांचे अत्यंत स्नेहाचे , जिव्हाळ्याचे संबंध होते. त्यांचे सर्वांशी असलेले जिव्हाळ्याचे संबंधच जिल्ह्यातील भाजप नेत्यांना पाहवत नव्हते. त्यामुळेच केंद्रीय नेतृत्वाकडून आपल्या कार्यक्षमतेच्या बळावर पहिल्या उमेदवारी यादीत उमेदवारी घोषित झालेल्या शृंगारे यांना भाजपच्या जिल्ह्यातील नेत्यांनी अगदी प्रचाराच्या पहिल्या दिवसापासूनच त्यांचा विजय कसा दूर जाईल, यासाठी प्रयत्न केले. आपल्या खासदारकीच्या काळात शृंगारे यांनी बौद्ध धम्म परिषदेसह विविध धार्मिक व सामाजिक उपक्रम राबवून बौद्ध धर्मातील समाजबांधवांना भाजपाकडे वळविण्याचे मोठे काम केले होते. शृंगारे यांच्या या कार्यामुळेच बौद्ध समाज या निवडणुकीतही त्यांच्या पाठीशी मोठ्या मताधिक्याने राहिला आहे. शृंगारे यांच्या पराभवामुळे हा समाज पुन्हा भाजप पासून दूर जाण्याची शक्यता नाकारता येत नाही. मागच्या सात वर्षाच्या काळात जिल्ह्यातील भाजपाला आर्थिक पाठबळ देण्यासह पक्ष संघटन वृद्धीसाठी त्यांनी जेवढे योगदान दिले आहे, तेवढे अन्य कोणत्याही भाजप नेत्याने दिले नसल्याचे कांबळे यांनी बोलून दाखविले. एवढे सगळे करणाऱ्या नेत्यालाच स्वपक्षाचे नेतेच जर विश्वासघात करून पराभूत करत असतील तर विश्वासाची अपेक्षा करायची तरी कोणाकडून ? अशी भावना कांबळे यांनी व्यक्त केली. अशा या सर्व समाजासाठी सर्वतोपरी योगदान देणाऱ्या सुधाकर शृंगारे यांच्या कार्याला बळ देण्यासाठी भाजपच्या वरिष्ठ नेतृत्वाने त्यांच्या आजपर्यंतच्या कार्याची दखल घेऊन लवकरात लवकर त्यांचे राजकीय पुनर्वसन करावे व सर्वांना सोबत घेऊन चालणाऱ्या या नेतृत्वास न्याय द्यावा, अशी आग्रही मागणीही समाजातील समर्थकांच्या वतीने आम्ही सर्वजण करत आहोत. यावेळी संजयभाऊ कांबळे यांच्यासह प्रा. बालाजी आचार्य, एड. सुभाष सोनकांबळे, मयूर कांबळे, संजय सोनकांबळे, धम्मानंद घोडके, महेंद्र आचार्य, सुनील क्षीरसागर, निवृत्ती भातकुळे, सतीश वाघमारे, नामदेव बामणे, सतीश मादळे, अरविंद सोनकांबळे, राजकुमार घाडगे, नाना घाडगे, विलास वाघमारे, बबन वाघमारे, चेतन महालिंगे, धम्मपाल सावंत, कैलास क्षीरसागर, गोविंद गायकवाड, अमोल शृंगारे यांच्यासह बौद्ध समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# परदेशी शिष्यवृत्तीकरिता १२ जुलैपर्यंत अर्ज करण्याचे सामाजिक न्याय विभागाचे आवाहन

लातूर :- सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत प्रती वर्षी अनुसूचित जाती प्रवर्गातील ७५ विद्यार्थ्यांना (मुले-मुली) परदेशांमध्ये अध्ययन करण्यासाठी राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिष्यवृत्ती योजनेअंतर्गत शिष्यवृत्ती प्रदान करण्यात येते. सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांनी परदेश शिष्यवृत्तीचा लाभ घेण्यासाठी १२ जुलै २०२४ पर्यंत अर्ज सादर करण्याचे आवाहन समाज कल्याण आयुक्त यांनी केले आहे. सामाजिक न्याय विभागाची परदेशी शिष्यवृत्ती योजना अत्यंत महत्वाची योजना आहे. सन २००३ पासून ही योजना राबविली जात आहे. अनुसूचित जातीच्या प्रवर्गातील मुला-मुलींना परदेशात पदव्युत्तर पदवी आणि संशोधनात्मक अभ्यासक्रमाचे (पी.एच.डी.) अध्ययन करण्यासाठी आर्थिक मदत देणे हा या योजनेचा मुख्य उद्देश आहे. या योजनेंतर्गत राज्यातील अनुसूचित जातीच्या प्रवर्गातील पदव्युत्तर पदवी आणि पी.एच.डी.साठी अद्ययावत (ट थीश्रव णपर्ळींशीींळीूं ठरपज्ञळपस) २०० च्या आतील परदेशातील शैक्षणिक संस्थेमध्ये प्रवेश घेणाऱ्या ७५ विद्यार्थ्यांना ही शिष्यवृत्ती मंजूर करण्यात येते. त्यापैकी ३० टक्के जागावर मुलींची गुणवत्तेनुसार निवड करण्यात येणार आहे. या योजनेचा लाभ घेण्यासाठी विद्यार्थ्यांनी विहीत नमुन्यातील अर्ज शासनाच्या ु.ारहरीरिर्हीीर.र्सीं.ळप या अधिकृत संकेतस्थळावरील 'ताज्या घडमोडी' या लिंकवरुन डाऊनलोड करुन घ्यावी. परिपूर्ण अर्ज विहीत मुदतीत व आवश्यक त्या कागदपत्रासह, समाज कल्याण आयुक्तालय, ३, चर्च पथ, महाराष्ट्र राज्य, पुणे-४११००१ या पत्त्यावर पाठवावेत. या योजनेसाठी पात्र असणाऱ्या विद्यार्थ्यांना विमान प्रवास भाडे, परदेशातील शैक्षणिक संस्थेची शिक्षण फी, निर्वाह भत्ता, आकस्मिक खर्च याचा लाभ मिळणार आहेत. पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी ३५ वर्ष व पीएचडीसाठी ४० वर्ष ही कमाल वयोमर्यादा असेल. भारतीय आयुविज्ञान परिषदेच्या संकेतस्थळावरील एमडी व एमएस अभ्यासक्रम प्रवेशासाठी पात्र असतील. त्याचप्रमाणे अधिक माहितीसाठी संकेतस्थळास भेट द्यावी, असे समाज कल्याण आयुक्तांनी केले आहे.

# रेल्वे गाड्यांचे वेळापत्रक विस्कळीत रद्द, विलंब नेहमीचेच; इंटरसिटी पुन्हा रद्द

किनवट/शेख शौकत :- किनवट नांदेड आदिलाबाद मार्गावर रेल्वे गाड्या रद्द होण्याचे प्रमाण वाढले आहे. अकरा दिवसांत आदिलाबाद-नांदेड इंटरसिटी एक्स्प्रेस चारवेळा रद्द झाल्याने प्रवाशांचे टेन्शन वाढले. नांदेड विभागातील नांदेड ते आदिलाबाद या मार्गावर रेल्वे गाड्यांचे वेळापत्रक विस्कळीत झाल्याने प्रवाशांची प्रचंड गैरसोय होत आहे. १० जून रोजी नांदेड येथून ३:२५ वाजता सुटणारी नांदेड- संत्रागच्ची ही सुपरफास्ट एक्स्प्रेस नांदेड येथून रात्री ८:२० वाजता नांदेड येथून सुटली. किनवट येथे सायंकाळी ६:१९ वाजता या गाडीचा वेळ असताना, चार तास उशिराने १०:४३ वाजता ही गाडी पोहोचली. त्यामुळे प्रवाशांची कुचंबना झाली. आदिलाबाद ते नांदेड या मार्गावर रेल्वेच्या समस्या वाढत आहेत.



तिरुपती ते आदिलाबाद या कृष्णा एक्स्प्रेसवर अवलंबून असलेल्या आदिलाबाद ते नांदेड इंटरसिटीने तर कहरच केला आहे, ही रेल्वे दररोज उशिरा धावत आहे. जून महिन्याच्या अकरा दिवसांमध्ये चारवेळा रेल्वे रद्द करण्यात आली. मंगळवारीदेखील इंटरसिटी एक्स्प्रेस रद्द झाली. जून महिन्यातील ११ दिवसांमध्ये १, ३.८ आणि ११ जून असे चार दिवस इंटरसिटी एक्स्प्रेस रद्द करण्यात आली आहे. हिंगोली व आदिलाबाद येथील लोकप्रतिनिधींचे मात्र याकडे दुर्लक्ष होत आहे.

# विद्यार्थांनी वैज्ञानिकांचे गुण अंगिकारून सर्वगुणसंपन्न व्हावे - पी.आर.ओ.प्रा.बळवंत सूर्यवंशी

## दयानंद विज्ञान महाविद्यालयात वैज्ञानिक ज्युल्स बोर्डेट यांची जयंती साजरी

लातूर: येथील दयानंद विज्ञान महाविद्यालयात दि. १३ जून २०२४ रोजी वैज्ञानिक 'ज्युल्स बोर्डेट' यांची १५४ वी जयंतीसाजरीकरण्यातआली.वैज्ञानिकांच्या जयंतीनिमित्त त्यांनी केलेल्या कार्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करून अभिवादन करण्याचा हा उपक्रम महाविद्यालय आपले कर्तव्य मानून राबवत आहे.

विद्यार्थांनी इतर उपक्रमांमध्ये सहभागी होऊन वैज्ञानिकांचे कार्य डोळ्यासमोर ठेवत प्रगती करावी आणि सर्वगुणसंपन्न व्हावे,असे मत पी.आर.ओ. प्रा.बळवंत सूर्यवंशी यांनी व्यक्त केले.

कार्यक्रमाची सुरुवात उपप्राचार्य प्रा.भाऊसाहेब सरवदे व पर्यवेक्षिका डॉ. संध्या वाडीकर यांनी वैज्ञानिकाच्या प्रतिमेस वंदन करून केली.प्रा.डॉ.कोमल गोमारे यांनी कार्यक्रमाची प्रस्तावना केली.ज्युल्स बोर्डेट यांच्याबद्दल जैवतंत्रज्ञान द्वितीय वर्षातील विद्यार्थीनी उत्कर्षा पाटील यांनी दिली.

ज्युल्स जीन बॅप्टिस्ट व्हिन्सेंट बोर्डेट (१३ जून १८७० - ६ एप्रिल १९६१) एक बेल्जियन इम्युनोलॉजिस्ट आणि सूक्ष्मजीवशास्त्रज्ञ होते.बॉर्डेटेला या जिवाणू वंशाला त्याचे नाव देण्यात आले आहे.शरीरविज्ञान किंवा वैद्यकशास्त्रातील नोबेल पारितोषिक १९१९ मध्ये त्यांच्या प्रतिकारशक्तीशी संबंधित शोधांसाठी त्यांना देण्यात आले.




तसेच एस एम जोशी सोशलिस्ट फाऊंडेशन आयोजित श्यामची आई पुस्तक वाचन व आकलन स्पर्धेमध्ये महाराष्ट्रातून जवळपास ४००० पेक्षा अधिक स्पर्धक सहभागी झाले होते,त्यातून उत्कृष्ट १० सहभागी बक्षिसपात्र ठरविण्यात आले. त्यामध्ये महाविद्यालयातील जैवतंत्रज्ञान विभागातील द्वितीय वर्षातील विद्यार्थीनी उत्कर्षा पाटील हिला उत्तेजनार्थ पारितोषिक मिळाले. तिच्या या संपादित यशाबद्दल तिला प्रोत्साहन देण्याकरिता उपप्राचार्य प्रा.भाऊसाहेब सरवदे यांनी पुस्तक देऊन सत्कार केला.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.जयप्रकाश दरगड व उपप्राचार्य डॉ.सिद्धेश्वर बेल्लाळे यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झालेल्या या कार्यक्रमात कनिष्ठ महाविद्यालयाचे पर्यवेक्षिका डॉ. संध्या वाडीकर,जैवतंत्रज्ञान विभागातील प्रा.स्वरुप गावकरे, सूक्ष्मजीवशास्त्र विभागातील डॉ.दीप्ती ढेरे,भौतिकशास्त्र विभागातील प्रा.मेघा आत्रम,वनस्पतीशास्त्र विभागातील प्रा.अश्विनी कांबळे, प्रा.पुजा नंदगावे,प्रा.चिद्रावार,प्रा. अनुजा कांबळे तसेच,पूजा सूर्यवंशी,छाया केसाळे,बी.बी. बचाटे व अश्विनी ढवारे व इतर शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांची उपस्थिती होती.

# भाजपचा सुपडा साफ करणार ;आमदार प्रतिभा धानोरकर

चंद्रपूर : प्रतिनिधी चंद्रपूरमधून आमदार प्रतिभा धानोरकर यांनी मुनगंटीवार यांचा २ लाख ६० हजार मतांनी पराभव केला. लोकसभेचा निकाल लागल्यानंतर खासदार प्रतिभा धानोरकर यांनी मतदारसंघात आभार दौरा काढला. यामध्ये त्यांनी डरकाळी फोडत येत्या विधानसभेच्या निवडणुकीत भाजपचा चंद्रपूर जिल्ह्यातून सुपडा साफ करणार असल्याचे



म्हटले.दरम्यान, नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीत राज्यात काँग्रेसने दमदार कामगिरी करत एका जागेवरून १३ जगांवर झेप घेतली. या निवडणुकीत भाजपच्या केंद्रीय मंत्र्यांसह राज्यातील मंत्र्यांनाही पराभवाची चव चाखावी लागली. यामध्ये सर्वाधिक मताधिक्याने पराभव स्वीकारावा लागला तो राज्यातील कॅबिनेट मंत्री सुधीर मुनगंटीवार यांना. यावेळी बोलताना धानोरकर म्हणाल्या, येत्या विधानसभेत जिल्ह्यातील सहा विधानसभेत मीच उमेदवार आहे असे समजून पक्षाचे काम करणार आहे. आणि यामध्ये सहाही विधानसभेत भाजपचा सुपडा साफ नाही केला तर प्रतिभा धानोरकर नाव लावणार नाही. आतापर्यंत काँग्रेसचे मंत्रिपद गडचिरोली जिल्ह्याला मिळत होते. पण यावेळी ते चंद्रपूर जिल्ह्याला कसे मिळेल यासाठी प्रयत्न करणार आहे, असेही खासदार धानोरकर यांनी स्पष्ट केले.

# क्रीडा व युवक कल्याण मंत्री संजय बनसोडे यांचा दौरा

लातूर : - राज्याच्या क्रीडा व युवक कल्याण, बंदरे विभागाचे मंत्री संजय बनसोडे १४ जून, २०२४ रोजी लातूर जिल्हा दौऱ्यावर येत आहेत. त्यांचा दौरा कार्यक्रम पुढीलप्रमाणे आहे. क्रीडा व युवक कल्याण मंत्री श्री. बनसोडे यांचे १४ जून रोजी सकाळी ६.३० वाजता लातूर रेल्वे स्टेशन लातूर येथे आगमन होईल व मोटारीने शंकुतला निवासस्थानाकडे प्रयाण करतील. सकाळी १०.३० वाजता लातूर येथून मोटारीने उदगीरकडे प्रयाण. सकाळी ११.३० वाजता उदगीरमधील भगीरथी नगर (समता नगर) येथील संकट मोचन हनुमान मंदिरात अखंड हरिनाम सप्ताह व ग्रंथराज ज्ञानेश्वर पारायण सोहळ्यास उपस्थित राहतील. दुपारी १२.०५ वाजता नळेगाव रोडवरील कृष्णाई मंगल कार्यालय येथे श्री. तात्याराव परबतराव पाटील यांच्या मुलाच्या साखरपुडा कार्यक्रमास उपस्थित राहतील. दुपारी १२.३० वाजता छत्रपती शिवाजी महाराज चौकातील चिद्रेवार टॉवर येथील लोकराजे बँकींग सेवा दि. लोकराजे शाहू महाराज मल्टीस्टेट ग्रो को-ऑप. सोसायटी लि. शाखा उदगीरच्या शुभारंभ सोहळ्यास उपस्थित राहतील. ना. बनसोडे यांच्या उपस्थितीमध्ये दुपारी १ वाजता उदगीर शासकीय विश्रामगृह येथे खरीप हंगाम पूर्व -२०२४ आढावा बैठक व नैसर्गिक आपत्तीत (विज पडून) मृत्यूमुखी पडलेले शेतकरी कुटूंबियास व पुशपालक यांना धनादेश वितरण केले जाईल. सायंकाळी ५ वाजता उदगीर येथील नागुरे मंगल कार्यालयासमोर प्रा. डॉ. संजय मुळे यांच्या निवासस्थानी सांत्वनपर भेट देतील. सांयकाळी ५.२० वाजता उदगीर शहरातील गांधीनगर येथे श्री. करण गुणाजी कांबळे यांच्या निवासस्थानी सांत्वनपर भेट. सांयकाळी ५.४० वाजता फुले नगर येथे श्रीमती निर्मलाबाई काळे यांच्या निवासस्थानी सांत्वनपर भेट, सांयकाळी ५.५५ वाजता फुले नगर येथील श्री. अशोकराव भालेराव यांच्या निवासस्थानी सांत्वनपर भेट, सांयकाळी ६.३० वाजता उदगीर तालुक्यातील मलकापूर येथे श्री. रमेश अर्जुन भालेराव यांच्या निवासस्थानी सांत्वनपर भेट देतील. सायंकाळी ७ वाजता तोंडार येथे श्री. निळकंठ बिरादार यांच्या निवासस्थानी सांत्वनपर भेट देतील व सोयीनुसार लातूरकडे प्रयाण करतील. लातूर येथे शकुंतला निवासस्थान येथे आगमन व राखीव.

# केंद्राकडून ४ लाख टन डाळीची आयात; मागच्या वर्षीच्या तुलनेत २० टक्क्यांनी वाढ

पुणे : एकीकडे शेतकऱ्यांच्या पिकोला हमीभाव द्यायचा नाही आणि दुसरीकडे मोठ्या प्रमाणावर तेलाची आणि डाळींची आयात करायची हे धोरण केंद्र सरकार मागच्या अनेक वर्षांपासून राबवत आहे. यामुळे शेतकरी कडधान्य पिकांवरून नगदी पिकांकडे वळाले आहेत.मागच्या आर्थिक वर्षीच्या सुरूवातीच्या दोन महिन्यांच्या तुलनेत यंदा डाळींच्या आयातीत २० टक्क्यांनी वाढ झाल्याची माहिती समोर आली आहे.

यंदा आर्थिक वर्षाच्या सुरूवातीच्याच दोन महिन्यामध्ये केंद्र सरकारकडून ३ लाख ७१ हजार ३३४ टन डाळींची आयात करण्यात आली आहे. मागच्या वर्षी याच दोन महिन्यांत ३ लाख ८ हजार ६१९ टन डाळींची आयात करण्यात आली होती. मागच्या वर्षीच्या तुलनेत यंदा दोन महिन्यांमध्ये डाळींच्या आयातीत २० टक्क्यांनी वाढ झाली आहे.

# २२ ते ३० जानेवारी दरम्यान सेलू येथे महासोमयाग यज्ञाचे आयोजन

लातूर - औसा तालुक्यातील सेलू येथे तब्बल शंभर वर्षांनंतर २२ ते ३० जानेवारी २०२५ दरम्यान महासोमयाग यज्ञाचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती सेलू ग्रामस्थांच्यावतीने आज १३ जून रोजी एका प्रसिद्धीपत्रकाद्वारे देण्यात आली आहे. औसा तालुक्यातील सेलू येथे श्रीकृष्ण महाराज सेलूकर यांच्या घराण्याच्यावतीने गेल्या तीन पिढ्यांपासून अग्निहोत्र सामेयागाचा प्रचार व प्रसार जगभरात केल्यामुळे स्वताच्या जन्मगावी येथे श्रीकृष्ण महाराज यांनी शंभर वर्षांपूर्वी एक सोमयाग यज्ञ केला होता. त्यानंतर त्यांचे सुपुत्र श्री दिक्षित रंगनाथजी महाराज सेलूकर यांनी वडिलांचा वारसा सातत्याने ८० वर्षे जतन करून विविध सोमयोग करून सातत्या ठेवले. त्यांच्या पश्चात तिसर्या पिढीतील बहुसोमयागी दिक्षीत यज्ञेश्वरजी महाराज सेलूकर यांचे शिष्यगण आणि ग्रामस्थांनी सेलू येथे एक बैठक घेवून सेलू येथे शंभर वर्षांनंतर हा महासोमयाग यज्ञ आजोबांच्या नंतर नातवाने हा महासोमयाग य* करावा ही संकल्पना आखून सेलू येथे एक बैठक घेण्यात आली. या बैठकीत २२ ते ३० जानेवारी २०२५ या नऊ दिवसांच्या कालावधीत महासोमयाग यज्ञ करण्याचा ठराव सेलू व नागोबावाडी मोराती मंदिरात सर्व ग्रामस्थांनी एकत्रित येवून घेतला.या महासोमयाग यज्ञाला सर्वतोपरी सहकार्य करण्याचा संकल्प केला. या बैठकीला लातूर जिल्हा व महाराष्ट्रातून सेलूकर महाराजांचे सर्व शिष्यगण मोठ्या संख्येने उपस्थित होते.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE